


दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता





vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.३१ ऑगस्ट २०२५ 9422660067 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 31 August 2025 9422660067 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 16 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# मराठा आरक्षणाच्या बाबतीत काळजी करू नका कायद्याच्या चौकटीत मार्ग निघेल-अजित पवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मराठा आरक्षणाच्या बाबतीत काळजी करु नका, सरकार सकारात्मक आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. तसेच शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. आंदोलन करण्याची वेळ कोणावरही येऊ नये, असेही पवार यावेळी म्हणाले आहेत. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.अजित पवार म्हणाले, न्यायालयाने दिलेले आदेश सर्वांनाच पाळावे लागतात. मराठा आरक्षणाच्या बाबतीत कसा मार्ग काढायचा याचा प्रयत्न चालला आहे. आम्ही त्याच्यातून मार्ग काढू. सरकार सकारात्मक आहे. जेवढे समाज आहेत, त्या सर्वांना न्याय मिळाला पाहिजे, मदत मिळाली पाहिजे. राजयकीय पक्षाचे काहीजण आंदोलनात सहभागी झाले आहेत. तो प्रत्येकाला अधिकार असल्याचे अजित पवार म्हणाले.आजपर्यंत आम्ही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे. कायद्याच्या चौकटीत मार्ग निघेल. राधाकृष्ण विखे पाटलांनी त्यांच्याशी संपर्क साधला असल्याची माहिती अजित पवारांनी दिली आहे. तसेच लक्ष्मण हाके यांच्या टीकांवरही अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे.अजित पवार म्हणाले, हाकेच्या आरोपांना काही किंमत देत नाही. कोणाच्या आरोपाला किंमत द्यावी याला महत्त्व आहे, असा टोला पवारांनी लगावला आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला अजित पवारांचा पाठिंबा असल्याचा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला होता. तसेच यांना ओबीसीचे आरक्षण काढून टाकायचे असल्याचा दावाही हाके यांनी केला होता.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, सरकार मराठा समाजाविषयी सकारात्मक आहे. त्यांच्याविषयी आमच्या मनात कोणतीही शंका नाही. पण काही लोक जाणिवपूर्वक हा प्रश्न चिघळवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी या आंदोलनावर स्वतःची पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नये. कारण, त्यांचे तोंड भाजेल, असे फडणवीस म्हणाले.



# तळोद्यात बिबट्याची दहशत

## पाळीव प्राण्यांवर हल्ले !

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहरातील पाडवी गल्ली परिसरात बिबट्याने शनिवार, ३० रोजी पहाटेच्या सुमारास एका गायीवर हल्ला करून तिला ठार केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली असून, वनविभागाच्या निष्क्रियतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



पाडवी गल्लीतील रहिवासी देविसिंग महारु पाडवी यांच्या घराशेजारी बांधलेल्या एका गायीवर बिबट्याने हल्ला चढवला. बिबट्याने गायीला सुमारे १०० मीटर फरफटत नेत तिच्या शरीराचा काही भाग खाऊन टाकला. ही घटना पाडवी गल्लीच्या अगदी जवळ घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मागील आठवड्यात याच परिसरात, भारत ऑइलमिल जवळ बिबट्याने घोड्याचा फडशा पाडला होता. या दोन हल्ल्यांमुळे बिबट्याची हिंमत वाढल्याचे दिसून येत आहे. घोड्यावरील हल्ल्यानंतर नागरिकांनी वनविभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी केली होती, मात्र वनविभागाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. यामुळे संतप्त नागरिकांनी वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

बिबट्याचा मुक्त संचार आता नागरी वस्तीतही सुरू झाल्याने मानवी जीविताला धोका निर्माण झाला आहे. वनविभागाने चीनोदा आणि काजीपूर शिवारात पिंजरे लावले असले तरी, पाडवी गल्ली परिसरात तात्काळ पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी जोर धरत आहे. रात्रीच्या वेळी बिबट्या पाळीव प्राण्यांना लक्ष्य करून आपली भूक भागवत असल्याने नागरिकांच्या रात्रीच्या हालचालींवरही मर्यादा आल्या आहेत.

बिबट्याला पकडण्यात वनविभागाला मिळत असलेले अपयश आणि त्यामुळे नागरिकांमध्ये वाढलेली भीती ही चिंतेची बाब आहे. स्थानिक नागरिकांची मागणी लक्षात घेऊन वनविभागाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# नंदुरबार जिल्ह्यात आयुष्मान भारत गोल्डन कार्ड वाटपाचा मेगा ड्राईव्ह यशस्वी!

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नागरिकांना आरोग्य सुरक्षा कवच देण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यात आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत एकाच दिवसात हजारो गोल्डन कार्डचे वाटप करण्यात आले. २९ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या मेगा ड्राईव्ह मोहिमेमुळे जिल्ह्याने आरोग्य संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

या विशेष शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांना मोफत गोल्डन कार्ड्स वितरित करण्यात आली. यामुळे, आता या कार्ड धारकांना देशातील कोणत्याही मान्यताप्राप्त रुग्णालयात रु. ५ लाखांपर्यंतचे मोफत उपचार मिळू शकतील.जिल्हा प्रशासनाच्या अथक प्रयत्नांमुळे हा मेगा ड्राईव्ह यशस्वी झाला. एकूण ६,५१८ लाभार्थ्यांना या शिबिरांचा लाभ मिळाला. यामध्ये



तालुकानिहाय वाटप करण्यात आलेल्या कार्ड्सची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:

अक्कलकुवा: ५५२ कार्ड्स
धडगाव: १२८० कार्ड्स
नंदुरबार: १२७८ कार्ड्स
नवापुर: १०२० कार्ड्स
शहादा: ९२९ कार्ड्स
तळोदा: ८३३ कार्ड्स
नंदुरबार नगर परिषद: २३७ कार्ड्स
शहादा नगर परिषद: ३८९ कार्ड्स

या मेगा ड्राईव्हमुळे जिल्ह्यातील गरजू कुटुंबांना आरोग्य सुविधा मिळवण्याचा मार्ग सोपा झाला आहे. भविष्यातही सर्व पात्र कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले.

# बीड शहराला दररोज पाणीपुरवठा करा-पुरुषोत्तम उर्फ (गोटू )वीर

## बिंदुसरा प्रकल्प व माजलगाव प्रकल्प जिल्ह्यातील सर्व तलाव ओव्हरफुल

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पाण्याच्या पुरवठ्या बाबत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. ज्यात त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या नगर परिषदेतर्फे फक्त पंधरा दिवसांनी पाण्याचा पुरवठा केला जात आहे. या परिस्थितीत शहरात पाण्याची गंभीर अडचण निर्माण झाली आहे. सध्या पावसाचे प्रमाण चांगले असून, बीड शहराला पाणी पुरवठा करणारी धरणे ओव्हर फ्लो झाली आहेत. मात्र, त्याचा लाभ शहरातील नागरिकांना मिळत नाही. पेठ बीड भागातील फिल्टर प्लांट वरून शहरातील



४०% पाणी पुरवठा केला जातो, तर उर्वरित पाणी बिंदुसरा प्रकल्प पाली येथील फिल्टर प्लांट वरून करण्यात येतो. पाली येथील बिंदुसरा प्रकल्प म्हणजेच पाली डॅम व माजलगाव डॅमही पूर्णपणे भरलेले आहे, त्यामुळे बीडकरांना दररोज पाणी पुरवठा केला जावा, अशी मागणी पुरुषोत्तम उर्फ (गोटू) वीर यांनी केली आहे.हे आव्हान लक्षात घेऊन नगरपालिका प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करत, पाण्याच्या वितरण पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. व्यवस्थेची गती वाढविणे आणि नागरिकांच्या जीवनात सोयीसुविधांची दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे.

# दिव्यात खाडी किनारी गावठी दारू बनवणारी हातभट्टी उद्धस्थ ; पोलिसांनी केला ८ लाखांचा मुद्देमाल नष्ट

**ठाणे । प्रतिनिधी**

ऐन गणेशउत्सवात दिवा शहरात खाडी किनारी गावठी दारू बनवणारी हातभट्टी केंद्रे दिवा पोलिसांच्या टीमने उद्धस्थ केले आहे. मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा पोलिसांनी सदर कारवाईत गावठी दारू बनविण्यासाठी लागणारे साहित्य व दारू असे जवळपास ८ लाखांचा मुद्देमाल नष्ट केला आहे.

दिवा पूर्व, गणेश नगर खाडी पट्ट्यात अवैध गावठी हातभट्टी गाळप केंद्र सुरू असल्याची गोपनीय माहिती दिवा पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यावरून दिवा पोलीस चौकी येथील सपोनि वसंत खतेले, सपोनि अमोल कोळेकर, सपोनि राजेंद्र तोरडमल, पोउपनि सुभाष मोरे, पोलीस अंमलदार गोविंद मुंढे, जयेश तामोरे, महेश जाधव, वसीम तडवी,



निळकंठ लोंढे यांचेसह गणेशनगर-आगासन दिवा पूर्व यादरम्यानचे खाडी परिसरात पंचांसह जाऊन पाहणी केली असता, गणेश नगर खाडीपट्ट्यातील दलदलीमध्ये गावठी हातभट्टी गाळप कारखाना व २०० ड्रम दारू बनविण्याचे रसायन (३६०० लिटर) मिळून आले. याबाबत इ साक्ष एप्लीकेशन मध्ये व्हिडिओ ग्राफी करून व सविस्तर पंचनामा करून गावठी हातभट्टी गाळप कारखाना, दोनशे ड्रम आणि त्यामधील दारू निर्मितीचे रसायन जागीच नष्ट करण्यात आले आहे.

# मोलगीजवळ वृद्ध व्यक्तीचा खून

## पोलिस तपास सुरू,अज्ञात मारेकऱ्यांचा शोध

**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगीजवळ एका वृद्ध व्यक्तीचा खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रुपा पोहल्या वसावे (वय ६०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांचा मृतदेह वेहगी गावातील नदीच्या पुलाजवळ खांद्यापासून उजवा हात गायब झालेल्या अवस्थेत आढळला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मोलगी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रुपा वसावे हे २६ जुलै रोजी सायंकाळी आपल्या घरातून बाहेर पडले होते. ते पारंपारिक पद्धतीने महिलांची प्रसूती करण्याचे काम करत असल्याने अनेकदा घराबाहेर जात असत. मात्र, दोन दिवस उलटूनही ते परत न आल्याने त्यांच्या नातेवाईकांनी त्यांचा शोध सुरू केला. २८ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजून ३० मिनिटाच्या सुमारास त्यांचा मृतदेह वेहगी गावातील नदीच्या पात्रात आढळून आला. मृतदेहाची अवस्था पाहता, हा अपघात नसून खून असल्याचा संशय बळावला.

या घटनेनंतर मोलगी पोलीस ठाण्यात प्रथम अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मात्र, शवविच्छेदन अहवालातून धक्कादायक खुलासे झाले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानुसार, रुपा वसावे यांचा मृत्यू छातीला झालेल्या गंभीर आघातामुळे (chest trauma) झाला आहे. तसेच, त्यांच्या मृतदेहावर डोक्याच्या, छातीच्या आणि कानाच्या भागावर गंभीर जखमा आढळल्या आहेत. विशेषतः, खांद्यापासून त्यांचा उजवा हात गायब असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. या अहवालावरून पोलिसांनी तात्काळ अकस्मात मृत्यूची नोंद रद्द करून अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (२०२३) च्या कलम १०३ (१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाची माहिती मिळताच, अपर पोलीस अधीक्षक अशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पावरा यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सध्या या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पावरा करत आहेत.

अद्याप आरोपींचा शोध लागलेला नाही, मात्र पोलिसांनी तपास वेगाने सुरू केला आहे. या गुन्ह्यामागील कारण अज्ञात असले तरी, पोलिसांनी लवकरात लवकर आरोपींना अटक करण्याचे आश्वासन दिले आहे. या घटनेमुळे स्थानिक आदिवासी भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.



संपादकीय

# जीव टांगणीला



गणरायाच्या आगमनाने सर्वत्र आनंदाचे वातावरण तयार झाले असताच, बुधवारी विरार येथील इमारत दुर्घटनेची बातमी महामुंबईत राहणाऱ्या नागरिकांच्या चेहऱ्यावर दु:खाचे सावट आणणारी ठरली. ३६ तासांच्या अथक बचावकार्यानंतरही त्यात १७ जणांना आपला जीव गमावावा लागला. विरार पूर्वेकडील नारंगी रोडवरील चामुंडा नगर आणि विजयनगरदरम्यान असलेल्या चार मजली 'रमाबाई अपार्टमेंट' या इमारतीची ही दुर्घटना आहे. इमारत संपूर्ण कोसळल्याने बांधकाम साहित्याचे मोठे ढिगारे झाले होते, त्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्यास बचाव कार्यास विलंब झाला. या दुर्घटनेदरम्यान घडलेली एक हृदयद्रावक कहाणी समोर आली. ओंकार जोईल यांच्या पत्नी आणि मुलीचा यात जागीच मृत्यू झाला. वडील ओंकार यांनी मुलीच्या वाढदिवसासाठी घर सजवले होते. केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. त्याचे फोटो नातेवाइकांना पाठवले. मात्र, केक कापून अवघी पाच मिनिटे झाली नसतील, तोच इमारतीचा एक भाग कोसळून जवळच्या चाळीवर कोसळला. या दुर्घटनेत उत्कर्षा जोईल आणि तिच्या आईचा मृत्यू झाला, ओंकार जोईल यांचा दुर्घटना झाल्यापासून पत्ता लागत नव्हता. अखेर हा मृतदेह दुसऱ्या दिवशी, गुरुवारी सापडला. विरारमध्ये बचाव पथक पोह इमारतीच्या बांधकामात कमी दर्जाचे सिमेंट आणि इतर साहित्य वापरले जाते, ज्यामुळे इमारतीची मजबुती कमी होते. इमारतीच्या सांगाड्याला पाणी लागल्यामुळे आणि ओलाव्यामुळे त्याचे बांधकाम कमकुवत होते, असे काही ठिकाणी दिसून आले. मुंबई शहरापासून विस्तारलेल्या ठाणे, भिवंडी, दिवा, वसई-विरार या ठिकाणी इमारती कोसळून यापूर्वी अनेक दुर्घटना झाल्याच्या घटना घडल्या. त्याची मुख्य कारणे अवैध बांधकाम, निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणे, जीर्ण इमारतींची योग्य देखभाल न करणे आणि निकृष्ट दर्जाचे बांधकाम हीच आहेत. विरारमधील रमाबाई अपार्टमेंटच्या दुर्घटनेमध्येही हेच घटक कारणीभूत ठरले. कारण ही इमारत पूर्णपणे बेकायदेशीर होती आणि तिचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होते. इमारतीत क्षमतेपेक्षा जास्त लोक राहिल्याने किंवा सामानाचा भार जास्त झाल्याने इमारतीवर ताण येतो आणि ती कोसळू शकते. त्याचप्रमाणे अनेक इमारती महापालिकेच्या परवानगीशिवाय बांधल्या जातात. हजारो कुटुंबे जीव मुठीत घेऊन त्यामध्ये राहत आहेत हे वास्तव नाकारून चालणार नाही. कधीकधी ढगफुटीसारख्या अतिवृष्टीमुळे इमारतींच्या पायाला आणि बांधकामाला धोका निर्माण होतो, असेही काही ठिकाणी दिसून येते. विरारमधील या इमारत दुर्घटनेच्या निमित्ताने आणखी एक प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे, तो म्हणजे मुंबईची हद्द सोडल्यानंतर पश्चिमेला नालासोपारा, विरारपर्यंत, तर पूर्वेला ठाणे, उल्हासनगर, डोंबिवली, कल्याण, बदलापूरपर्यंत अनधिकृत इमारती किती आहेत, याचे नव्याने सर्व्हेक्षण करण्याची गरज आहे. मुंबईत राहणारा मराठी माणूससुद्धा कुटुंबासाठी जागा अपुरी पडू लागल्यामुळे, याच भागात गेल्या ३० -३५ वर्षांत स्थलांतरीत झालेला दिसला. काही महिन्यांपूर्वी डोंबिवलीतील बेकायदेशीर इमारती पाडण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते. परंतु, या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचा दोष काय? त्यांना अभय मिळावे यासाठी सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून सहानुभूती दाखविण्यात आली होती. वीस ते तीस लाख रुपयांचे कर्ज घेऊन, या अनधिकृत इमारतीत घरे घेणाऱ्यांच्या बाजूने विचार केला, तर माणुसकीच्या दृष्टिकोनातून तो योग्य विचार आहे असे मानायला हरकत नाही; परंतु आपल्याकडे घर खरेदीतील पारदर्शकता, त्याबाबत असलेल्या नियमांकडे नागरिकांमध्ये अनभिज्ञता असल्याने अनेक इमारतींतील घरांची कागदपत्रे बिल्डरकडून केवळ प्रतिज्ञापत्राच्या आधारावर केली जात आहेत. १०० ते ५०० रुपयांच्या

# पर्यटनस्थळावरील उपकर म्हणजे शाश्वत पर्यटनात सहभाग

मधुसूदन जोशी पर्यटन हे आपल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी एक आवश्यक साधन आहे. पर्यटनावर कितीतरी व्यवसाय, व्यक्ती अवलंबून असतात. पण आताच्या काळात पर्यटन थोडे महाग वाटू लागते ते केवळ महागाई वाढल्याने नाही, तर पर्यटनावर लावल्या गेलेल्या करामुळे. आपण पर्यटनासाठी विविध हॉटेल्स वापरतो, प्रवासासाठी गाडी किंवा क्रूझ वापरतो, अभयारण्यात जातो. प्रत्येक ठिकाणची जैवविविधता जपण्यासाठी आणि वातावरणातील बदलात सुसूत्रता राखण्यासाठी काही विशिष्ठ वाढीव रक्कम कराच्या रूपात द्यावी लागते आणि आता ते अपरिहार्य झालंय. २०२३ च्या ऑगस्ट महिन्यात हवाई बेटांवर शुष्क जंगलांना आगीने वेढले, त्यात महाभयंकर वादळी वाऱ्याने त्या आगीला रौद्र रूप दिले. परिणामस्वरूप १०२ जणांनी प्राण गमावले, तर सुमारे २००० इमारतींचे नुकसान झाले. वातावरण बदलाचा परिणाम ठरलेले आणि प्रलयकारी आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेले ते अमेरिकेतील एक ठिकाण ठरले. या वर्षी मे महिन्यात 'हवाई'च्या प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण पण दूरगामी निर्णय घेतला. ग्रीन टॅक्स या नावाने ओळखला जाणारा हा कर, पर्यटकांकडून ०.७५% इतका वसूल करण्यास सुरुवात केली. अर्थातच याचा परिणाम म्हणून हॉटेलचे टॅरिफ, रेस्टॉरंट मधील खाद्यपदार्थ यांचे दर, यांच्यात वाढ झाली. यामागील भूमिका विशद करताना तिथल्या गव्हर्नरने म्हटले की यामुळे २०२६ पासून होणाऱ्या पुनर्वसनाच्या निमित्ताने आगीच्या भक्षस्थानी पडलेल्या इमारती वगैरेंचे नुकसान अंशतः भरून निघेल आणि यामुळे साधारण १०० दशलक्ष डॉलर्स इतकी रक्कम जमा होईल. हवाई चे गव्हर्नर जनरल जोश ग्रीन एका पत्रकार परिषदेत म्हणाले की वार्षिक १० दशलक्ष पर्यटक या बेटांना भेट देतात यावेळी वातावरणीय संकटांचा मुकाबला करण्याच्या दृष्टीने हे एक



महत्वाचे पाऊल ठरेल. सुसान फाझेकास तेथील अवापूही अडव्हेंचर्स क्लबचा मालक आणि गिर्यारोहण आयोजक. त्याच्या मते येणाऱ्या पर्यटकांकडून उपकर घेणे हे पर्यटकांवर ओझे नाही तर तेथील निसर्गसौंदर्य, धबधबे आणि इतर सौंदर्यस्थळे यांचे संवर्धन करण्यासाठी दिलेले एक सह-उत्तरदायित्व आहे. या करामुळे संवर्धनाचा भार केवळ स्थानिक प्रशासनावर पडत नाही. जानेवारी २०२४ मध्ये ग्रीसच्या प्रशासनाने एके दिवशी तिथे रात्री राहण्याच्या प्रवासी करात ०.५० युरो ते १० युरो इतकी वाढ केली. तेथील प्रसिद्ध मेकॅनोस किंवा सँटोरिनी बेटांवर अति गर्दीच्या काळात हे पाहायला मिळते. या उपकारातून तेथील प्रशाशन ४०० दशलक्ष युरोची जमा रक्कम अपेक्षित करते. त्यातून पाण्याचे व्यवस्थापन, आपत्तींना प्रतिबंध जैवविविधतेचे संवर्धन याचा खर्च निघू शकतो. बाली, मालदीव बेटांवर २०१५ सालापासून प्रत्येक रात्रीच्या निवासासाठी विशिष्ट उपकर आकारला जायचा जो २०२५ पासून वाढवण्यात आला आहे, न्यूझीलंडने २०१९ साली प्रथम आंतरराष्ट्रीय पर्यटकांकडून उपकराच्या वसुलीला सुरवात केली जी २०२४ मध्ये तिथल्या चलनात म्हणजे न्यूझीलंड डॉलर मध्ये १०० डॉलर इतकी आहे. या कराचा उपयोग पर्यावरण संवर्धन, प्रवाशांच्या सोयी आणि देशातील पर्यटनाच्या शाश्वत व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी होतो. वर्ल्ड ट्रॅव्हल अँड टुरिझम कौन्सिलचे संशोधन आणि शाश्वतता या विषयावरील उपाध्यक्ष ख्रिस्तोफर इम्बसें म्हणतात की असे उपकर हे पर्यटकांना बंधन नसून आपल्या पर्यटनाच्या दरम्यान केलेल्या मौजमजेच्या निमित्ताने त्या त्या ठिकाणच्या पर्यावरण संवर्धनासाठी लावलेला हातभार वाटतात. बुकिंग डॉट कॉम ने २०२४ मध्ये केलेल्या एका सर्वेक्षणानुसार ७५% जागतिक पर्यटक असे उपकर देण्यास आनंदाने तयार असतात. त्यांना भेट दिलेल्या ठिकाणांची परिस्थिती चांगल्या प्रकारे बदलण्यासाठी योगदान देण्यात आनंद वाटतो. युरोमॉनिटर ने २०२३ साली केलेल्या एका सर्वेक्षणात जागतिक पर्यटक १०% इतका उपकर देण्यास राजी असतात ज्यात शाश्वत पर्यटनाची हमी असते. महो तनाका या जपानी जाहिरातदार व्यवसायिकेच्या म्हणण्यानुसार हवाई बेटांना भेट देण्यासाठी द्यावा लागणार अतिरिक्त उपकर ०.७५% इतका असेल तर पर्यटकांच्या आवाक्यात असेल. पर्यटकांना देखील हवाई बेटांवरील जंगल आणि समुद्रकिनारे यांच्या संवर्धनाच्या सामाजिक उपक्रमाचा भाग होणे आवडते. यापुढच्या काळात पर्यावरणाची जितकी आव्हाने पर्यटनाच्या दृष्टीने येतील त्यांना सामोरे जाण्यासाठी स्थानिक प्रशासनाला उपकराच्या रूपाने आपण अंशदान द्यायला हवे. सरकार सगळे पाहील ही वृत्ती न ठेवता आपले ते एक जागतिक कर्तव्य आहे. आपण एक जबाबदार नागरिक या दृष्टीने जगात पर्यटन करताना या नैसर्गिक उपद्रवांचे भान ठेऊन त्यावर मात करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करायला हवेत. फक्त या वसुलीत पारदर्शकता हवी. या आनुषंगाने मालदीवचे प्रशासन मासिक ग्रीन टॅक्स रिपोर्ट प्रकाशित करते. या उपकराचा विनियोग, पाण्यावरील प्रक्रिया, जलमार्ग यांच्यासाठी कसा करण्यात आला हे प्रकाशित करते. अशाच पद्धतीचा अहवाल न्यूझीलंड चे प्रशासन दरवर्षी प्रकाशित करते ज्यात कोणत्या प्रकल्पांवर किती खर्च करण्यात आला, तिथे प्रचलित असलेल्या सायकल ट्रेल मार्गाच्या संवर्धनासाठी किती निधी वापरला गेला इत्यादींचे तपशील असतात. हवाई बेटांनी याबाबत एक ६० पानी अहवाल प्रकाशित केला ज्यात दुर्दैवी आगीच्या भक्षस्थानी पडलेल्या वास्तूंचे पुनर्स्थापन कशाप्रकारे केले याचा तपशील प्रसिद्ध केला. या सर्व लेखाचा मतितार्थ इतकाच आहे की पर्यटनाच्या निमित्ताने आपल्याकडून नकळत पर्यावरणाची हानी होते. एक प्रकारे हे पातकच. हा कर देणे म्हणजे या पातकाची भरपाई त्याला पर्यटकांनी तयार असावे.

# श्री संत गजानन महाराजांची महीमा अपरंपार

श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळेच त्यांना ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते.कारण त्यांची महिमा संपूर्ण ब्रम्हांडात प्रचलित असल्याचे दर्शविते. आज जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तर आपल्या लक्षात येईल की भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. कारण महाराष्ट्रात अनेक थोर संत,महात्मे झालेत त्यातलेच संत गजानन महाराज आहेत व त्यांची महीमा अपरंपार आहे. आपल्याला गजानन महाराजांचे अनेक चमत्कार दिसून येतात.त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात शांततेचे प्रतिक म्हणून शेगावचे गजानन महाराजांचे मंदिर व तेथील परिसर प्रसिद्ध आहे. संत गजानन महाराज माघ वद्य ७ शके १८००(दिनांक २३ फेब्रुवारी १८७८) रोजी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे तारूण्याअवस्थेत प्रगत झालेत.आज संपूर्ण भारतात श्री संत गजानन महाराजांमुळे महाराष्ट्रातील शेगाव हे गाव प्रसिध्दीस आले.साधू देविदास पातूरकरांच्या मठाबाहेर पडलेल्या उष्ट्या पत्राळीतील अन्नाचे कण वेचून खात होते व गाईगुरांकरीता पिण्यासाठी ठेवलेले पाणी पिऊन निघून गेले.ते पुढे बार्शी येथील ब्रम्हनिष्ठ श्रीगोविंद महाराज टाकळीकर यांचे शेगावी महादेवाच्या मंदिरात कीर्तन झाले. त्याप्रसंगी टाकळीकरांच्या बेफाम असलेल्या घोड्यांच्या चौपायांत श्री गजानन महाराज हे ब्राह्मानंदी निमग्न होऊन निजलेले आढळले परंतु तुफान घोडा शांत झाला. अशाप्रकारे तुफान घोड्याला गजानन महाराजांनी शांत केले.तत्काळ गोविंद महाराजांनी संत गजानन महाराजांची योग्यता ओळखुन भक्तीभावाने पूजा केली व त्यांची महती शेगाव निवासी लोकांना सांगितली. तेव्हापासुनच संत श्री गजानन महाराजांची प्रसिद्धी झाली.यानंतर महाराजांचे अनेक चमत्कार लोकांना दिसून आले. बंकटलाल अग्रवाल यांना गजानन महाराज प्रथमच दिसले असता गण गण गणात बोते असे उच्चारत त्यांचे भजन नेहमीच सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांना गजानन महाराज ही अद्भुत शक्ती असल्याचे लक्षात आले व गण गण गणात बोते



हा जाप सर्वांच्याच हृदयात बसला व गजानन महाराजांची महीमा संपूर्ण शेगावी पसरली.कारण गजानन महाराज ही दैवी शक्ती होती आणि आहे.गजानन महाराजांचे अनेक चमत्कार आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या रूपात पहायला मिळतात.महाराजांच्या तीर्थानेच जानराव देशमुख नावाच्या गृहस्थ मरणोन्मुख स्थितीतुन बरे झाले.अनेक भक्तांना साक्षात पांडुरंगाचे दर्शन गजानन महाराजांनी घडविले.गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीतील सिध्दकोटीला पोहचलेले महान संत होते. त्यांची दिनचर्या अशा पध्दतीची होती की वाटेल ते खावे, कोठेही पडुन रहावे व कोठेही संचार करावा अशा पध्दतीने ते रहात असे.एकेवेळी तर एका स्त्रीने मिर्चीचा वाटलेला मोठा गोळा खायला दिला तो गोळा त्यांनी मोठ्या आनंदाने खाल्ला जनुकाय पेढे-बर्फी खातात याप्रमाणे खाल्ला व लोटाभर पाणी पिऊन तृप्त झाले गण गण गणात बोते असे अहर्निश भजन उच्चारत निघून गेले.गजानन महाराजांच्या मुखातून नेहमीच गण गण गणात बोते या शब्दांचे उच्चारण व्हायचे त्यामुळे संपूर्ण भक्तगण श्री संत गजानन महाराज म्हणुन संबोधु लागले.यानंतर त्यांना वाटले की आता आपले मानवी रूपातील कार्य संपले असुन पुढील कार्य ईश्वरचरणी जाऊन करण्याचे ठरविले व २ वर्षे आधीच महाराजांनी समाधीचे सूतोवाच केले होते. सध्याच्या समाधीगृहाकडे बोट दाखवत तिथेच राहीन रे! असे उद्गार काढले होते. समाधी घेण्याच्या १ दिवस आधी चतुर्थीला महाराज भक्तांना म्हणाले गणेश पुराणात कथा आहे की चतुर्थीला पार्थिव गणपतीचे पूजन करून दुसरे दिवशी विसर्जन करावा, त्याप्रमाणे भक्तहो तुम्ही या पार्थिव देहाला विसर्जित करण्याची वेळ आली आहे. यत्किंचित दुःख करू नका कारण तुम्हा भक्तांचा सांभाळ करण्यासाठी आम्ही इथेच राहणार आहोत. भक्तहो तुमचा कदापि विसर पडणार नाही. महाराज पुढे म्हणाले शरीर हे वस्त्रापरी आहे आणि त्याला बदलणे गरजेचे आहे असे भगवंताने अर्जुनाला गीतेमध्ये सांगितले आहे. शेवटी महाराजांनी ऋषि पंचमीच्या दिवशी ८ सप्टेंबर १९१० ला सकाळी ८ च्या दरम्यान संजीवन समाधी घेतली व पद्मासनात स्थिर होऊन प्राण रोधून मस्तकी धारण केला आणि मुखातून शब्द आले जय गजानन!आजही महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात श्री संत गजानन महाराजांची महीमा अपरंपार असल्याचे दिसून येते आणि सर्वत्र पुजाअर्चना मोठ्या भक्तिभावाने व उत्साहाने साजरी केली जाते.गजानन महाराजांनी विठ्ठल रूपी अनेकांना दर्शन दिले आहे. दररोज शेगावला हजारोंच्या संख्येने वेगवेगळ्या भागातुन भाविक श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात. त्याचप्रमाणे याठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.कारण महाराष्ट्रासह अनेक राज्यातुन महाराजांचे दर्शन करण्यासाठी मोठा जनसमुदाय येत असतो अशा प्रकारे श्री संत गजानन महाराजांची लीला अपरंपार असल्याचे आपल्याला सर्वत्रच दिसुन येते.महाराष्ट्रात घरोघरी समाधी सोहळ्याच्या निमित्ताने गजानन महाराजांची पुजाअर्चना करून भक्तीभावाने संत गजानन महाराजांचा गजर करतात व आपली मनोकामना पूर्ण करतात. त्याचप्रमाणे समाधी दिनाच्या निमित्ताने अनेक गावांत,शहरात मोठ्या प्रमाणात भजण, किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते व आपल्याला सर्वत्र संत गजानन महाराजांचा गजर ऐकायला मिळतो.संत गजानन महाराज हे महान संत होऊन गेले त्यामुळे त्यांच्या समाधी दिनी (ऋषीपंचमी)च्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे.कारण दिवसेंदिवस जंगलसंपदा नष्ट होतांना आपण पहातो. परंतु महाराजांच्या समाधी सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण भक्तगणांकडुन वृक्षारोपण व्हायला हवे.कारण जंगल तोडीमुळे संपूर्ण निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे व हे सर्व आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. याचाच परिणाम आपल्यालाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावा लागतो आहे.यामुळे सुनामी, भूकंप,वनवालागने, समुद्राची पातळी वाढणे,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस,भुस्खणन मोठ्या प्रमाणात दिसून येते.याकरीता आज निसर्गाला वाचविण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.आपण व संपूर्ण भक्तगणांनी श्री संत गजानन महाराजांच्या समाधी दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवड केली तर निसर्ग प्रफुल्लित राहिल व प्रत्येक झाडांच्या पानात,फुलात, फळात आपल्याला गजानन महाराजांचे दर्शन अवश्य होईल.कारण गजानन महाराजांचे संपूर्ण जीवन हे झाडांच्याच सानिध्यात राहाले आहे.वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन व सावली मिळेल. यातच आपल्या साक्षात संत गजानन महाराज अवश्य दिसून येईल व आपण केलेल्या कार्याचे सार्थक अवश्य दिसून येईल.त्यामुळे भक्तांना आग्रहाची विनंती आहे की समाधी दिनाच्या निमित्ताने जास्तीत जास्त वृक्षारोपण व्हावे या दृष्टिकोनातून पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.श्री संत गजानन महाराजांच्या समाधी दिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम!जय गजानन महाराज!

**रमेश कृष्णराव लांजेवार**

# सोन्याचे भाव पडतायत, खरेदी करावी की विकावी?

जागतिक तणाव कमी झाल्याने गेल्या दहा दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने घट दिसून येत आहे. यापूर्वी सोन्याने विक्रमी उच्चांक गाठला होता. आता या घसरणीमुळे गुंतवणूकदार आणि सराफी व्यापारी दोघेही बारकाईने लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे, आता सोने खरेदी करायचे की विकायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

गेल्या दहा दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने घट होत आहे. यापूर्वी ८ ऑगस्ट रोजी सोन्याच्या किमती विक्रमी उच्चांकावर पोहोचल्या होत्या, पण त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी २२ कॅरेट सोन्याचा भाव सुमारे ९,२८० रुपये प्रति १० ग्रॅम होता. या घसरणीचे मुख्य कारण म्हणजे जागतिक आर्थिक संकेत आणि भू-राजकीय तणावामध्ये आलेली घट. जेव्हा जागतिक बाजारपेठ अस्थिर असते, तेव्हा गुंतवणूकदार सोन्याला एक सुरक्षित गुंतवणूक मानतात. पण आता रशिया-युक्रेन युद्धातून शांततेची शक्यता निर्माण झाली आहे आणि अमेरिका-चीन यांच्यातील व्यापार तणावही काही प्रमाणात कमी झाला आहे. अशा परिस्थितीत सोन्याची 'सुरक्षित गुंतवणूक' म्हणून असलेली मागणी घटली आहे, ज्यामुळे दरात घसरण दिसून येत आहे.

सोन्याच्या दरातील या घसरणीचे सराफी व्यापाऱ्यांनी स्वागत केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, दरात वाढ झाल्यामुळे अनेक खरेदीदार थांबले होते. आता किंमती कमी झाल्यामुळे ते पुन्हा बाजारात येतील, ज्यामुळे सोन्याची मागणी वाढेल. सण-समारंभाच्या दिवसांपूर्वी ही घसरण बाजारासाठी एक सकारात्मक संकेत आहे.



एका प्रमुख वित्तीय सेवा कंपनीच्या वाणिज्यिक संशोधन विभागाच्या उपाध्यक्षांच्या मते, आगामी काळात सोन्याच्या दरात चढ-उतार दिसून येऊ शकतात. या काळात गुंतवणूकदारांचे लक्ष अमेरिकेच्या आर्थिक आकडेवारीवर आणि पुढील महिन्यात होणाऱ्या 'युएस फेडरल रिझर्व्ह'च्या बैठकीवर असेल. या बैठकीतील निर्णय सोन्याच्या दरांना प्रभावित करू शकतात. एका आघाडीच्या वित्तीय सेवा कंपनीच्या तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, सोन्याच्या दरातील घसरण तात्पुरती असून ती जागतिक परिस्थिती आणि आर्थिक धोरणांशी जोडलेली आहे.

एकंदरीत, सोन्याच्या दरातील घसरण ही जागतिक परिस्थिती आणि आर्थिक धोरणांशी जोडलेली आहे. गुंतवणूकदारांनी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी या सर्व घटकांचा काळजीपूर्वक अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. कोणताही मोठा निर्णय घेण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे नेहमीच चांगले असते, कारण सोन्याची गुंतवणूक नेहमीच फायदेशीर ठरते

# मोफत पार्किंग सुविधेमुळे शिर्डीतील वाहतूक सुरळीत-मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**शिर्डी । प्रतिनिधी**

साईबाबा संस्थानच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मोफत पार्किंग सुविधेमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था नियंत्रित ठेवण्यास मोठा हातभार लागणार असून मंदिरासमोरील मार्ग भाविकांसाठी अधिक सोयीचा ठरेल, अशी अपेक्षा जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.





साईबाबा संस्थानतर्फे मध्यवर्ती भागात सुरू करण्यात आलेल्या मोफत पार्किंग सुविधेचा औपचारिक शुभारंभ पालकमंत्री श्री.विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, मुख्याधिकारी सतीश दिघे, माजी नगराध्यक्ष कैलास कोते, अभय शेळके, विजय जगताप, रविंद्र गोंदकर, बाबासाहेब कोते यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

भाविकांसाठी सुरू केलेल्या या पार्किंग सुविधेचे स्वागत करून श्री.विखे पाटील म्हणाले, या सुविधेमुळे भाविकांची मोठी सोय होणार आहे. शिर्डीत येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेतली तर शहरात पार्किंगसाठी कुठेही जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व वाहने व प्रवासी बस रस्त्यावर उभी राहत असल्याने वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते.पुढील काळात खासगी प्रवासी बससुद्धा या ठिकाणाहून सोडाव्यात, अशी सूचना त्यांनी केली. नव्या पार्किंग ठिकाणाहून संस्थानतर्फे भाविकांसाठी बस सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरीदेखील या ठिकाणी स्वच्छतागृह, वीजेची सुविधा व पक्के बांधकाम होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात थांबण्याची सोय निर्माण करण्यात यावी. तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी छोट्या इलेक्ट्रिक बस संस्थानने घ्याव्यात, अशी सूचना मंत्री विखे पाटील यांनी केली.या पार्किंग सुविधेमुळे मंदिर परिसर भविष्यात 'नो पार्किंग झोन' म्हणून घोषित करता येईल. याचा थेट फायदा वाहतूक नियंत्रणासाठी होईलच, शिवाय शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. आगामी काळात शिर्डी शहराच्या सौंदर्यीकरणाचे व्यापक काम हाती घेण्यात येणार असल्याचेही श्री.विखे पाटील यांनी सांगितले.

# नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते शुभारंभ

## ६१० किलोमीटरचे अंतर ९ ते ९.३० तासात होणार पूर्ण

**मुंबई (वृत्तसंस्था)**–नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा नांदेड रेल्वे स्थानकावरून शुभारंभ करण्यात आला. या रेल्वे गाडीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातून ऑनलाइन पद्धतीने हिरवा झेंडा दाखवला. मराठवाड्याच्या विकासासाठी शासन दळणवळण सुविधांवर भर देत आहे. 'वंदे भारत एक्सप्रेस' मुळे नांदेड शहर मुंबईच्या अधिक जवळ आले आहे. यामुळे निश्चितच मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार उघडले आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.मंत्रालयात आयोजित कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना, प्रधान मुख्य परिचालन अधिकारी श्याम सुंदर गुप्ता, मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम) अवनीश कुमार पांडे, विभागीय प्रबंधक हिरेश मीना आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय रेल्वे कात टाकत आहे. प्रगत देशांसारखी आरामदायी सुविधा असलेली भारतात निर्मित वंदे भारत रेल्वे ही त्याचेच प्रतीक आहे. मुंबई ते नांदेड हे ६१० किलोमीटरचे अंतर ९ ते ९.३० तासात पूर्ण होणार आहे. पूर्वी जालनापर्यंत धावणारी वंदे भारत आता हुजूर साहिब नांदेड पर्यंत जात आहे. या रेल्वे गाडीची क्षमता ५०० वरून १४४० पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच गाडीचे डब्बे ८ वरून २० पर्यंत वाढवण्यात आले आहे.नांदेड हे शिख धर्मियांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, प्रवाशांना वेगवान व आरामदायी प्रवासाची अनुभूती 'वंदे भारत' एक्सप्रेसच्या माध्यमातून होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसच्या सुखकर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी मराठवाड्यातील जनतेचे अभिनंदनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले



नांदेड येथे आयोजित कार्यक्रमप्रसंगी खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, नांदेड परिशेत्राचे पोलिस उपमहनिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, डीएमआर प्रदीप कांबळे आदी उपस्थित होते.नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचे एसी चेअर कारचे तिकीट १६१० रुपये आहे. जेवण न घेतल्यास त्यातून ३६४ रुपये कमी होतील. तर एक्झिक्युटिव्ह चेअर कारचे तिकीट २९३० रुपये असून जेवन न घेतल्यास त्यातून ४१९ रुपये वजा होतील. नांदेडहून वंदे भारत एक्सप्रेस पहाटे ५ वाजता सुटेल ती दुपारी अडीच वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला पोहोचेल. नांदेड मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचे तिकीट बुकिंग २८ ऑगस्टपासून तर मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेसचं तिकीट २७ तारखेपासून बुक करता येईल.मुंबई ते नांदेड वंदे भारतच्या एसी चेअर कार प्रवासाचे तिकीट १७७५ रुपयांना असेल. यातून ५३० जेवणाचे वजा केल्यास ते १२४० रुपयांवर येईल. तर, एक्झ्युकेटिव्ह चेअर कारचे तिकीट ३१२५ रुपये आहे. त्यातून ६१३ वजा केल्यास ते २५१२ रुपयांवर येईल. मुंबईतून नांदेडला जाणारी वंदे भारत एक्सप्रेस दुपारी १ वाजता सुटेल ती रात्री १०.५० वाजता पोहोचेल.

# उद्धव ठाकरे राज ठाकरेंच्या निवासस्थानी दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या घरी जाऊन गणपतीचे दर्शन घेतले. राज ठाकरे यांनी शिवसेना पक्ष सोडल्यानंतर तब्बल २० वर्षांनी उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या घरी गेले. उद्धव ठाकरे यांनी शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी सहकुटुंब जात गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी आदित्य ठाकरे तसेच रश्मी ठाकरे उपस्थित होत्या. उद्धव ठाकरे यांना राज ठाकरे यांनी फोन करत गणपती दर्शनाचे निमंत्रण दिले होते. त्याला सकारात्मक उत्तर दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनी शिवतीर्थ गाठले होते. यावेळी दोन्ही कुटुंबात स्नेहभोजन देखील झाले. तसेच समोर आलेल्या माहितीनुसार उद्धव



ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या दोघांमध्ये जवळपास अर्धा तास चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. तसेच स्नेहभोजन करत असताना देखील सगळे सोबतच होते. त्यामुळे आता पुन्हा एकदा युतीच्या चर्चांना उधाण येऊ शकते.मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही बंधू विजयी मेळावा घेत एकत्र आले होते. त्यानंतर २७ जुलै रोजी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसासच्या निमित्ताने राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जात त्यांना शुभेच्छा दिल्या होत्या. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधूमध्ये जवळीक वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दोन्ही नेते युती करणार असल्याचे बोलले जात आहे.आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने एकत्र येणार का? असा अनेकवेळा प्रश्न विचारण्यात अल असला तरी देखील दोन्ही नेत्यांनी योग्य वेळी भूमिका घेऊ असे उत्तर दिले आहे. परंतु, वारंवार होणाऱ्या भेटीमागे केवळ कौटुंबिक कारण आहे की राजकारण आहे, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. मात्र, अद्याप तरी त्यांनी अधिकृत युतीची घोषणा केलेली नाही. परंतु, आगामी महापालिके च्या निवडणुकीच्या अनुषंगाने दोन्ही नेते एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# राज्यात गणेशोत्सवावर पावसाचे सावट

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात गणेश चतुर्थीच्या काळात राज्यात जोरदार पाऊस परतण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघरसह संपूर्ण कोकण, तसेच उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील सर्व जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. मराठवाड्यातही काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. या काळात नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.महाराष्ट्रात ८ ते १० दिवसांपूर्वी झालेल्या पावसाचा मोठा तडाखा बसला होता. मुंबईसह नांदेड जिल्ह्यात मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर पावसाने उघडीप देत थोडा दिलासा दिला होता. मात्र, आता पुन्हा बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र, पश्चिमी विक्षोभ आणि चक्रीवादळी वाऱ्यांमुळे देशभरातील हवामानात बदल झाला आहे. त्यामुळे हवामान विभागाने पुढील तीन दिवसांसाठी पावसाचा अलर्ट जारी केला आहे.



# जरांगेंच्या मागण्याी पूर्ण करण्याची सरकारची मानसिकता आहे का?-अंबादास दानवे

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकार आणि ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी मराठा विरुद्ध ओबीसी असा कोणताही वाद नसल्याचे स्पष्ट केले आणि काही ओबीसी नेते जाणीवपूर्वक वाद निर्माण करत असल्याचा आरोप केला. तसेच मनोज जरांगेंच्या मागण्या मान्य करण्याची सरकारची मानसिकता आहे का? असा सवाल करत, भाजपला मराठा आंदोलनात रस नसल्याचे ते म्हणाले.छत्रपती संभाजीनगर येथे ग्रामदैवत संस्थान गणपती मंदिरात आज सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत पूजा व महाआरती पार पडली. यानंतर अंबादास दानवे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी त्यांना मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मराठा ओबीसी समाजामध्ये वाद निर्माण झाला आहे का? असा प्रश्न विचारला असता, त्यांनी सरकार आणि लक्ष्मण हाके यांच्यावर उपरोक्त टीका केली.



अंबादास दानवे पुढे म्हणाले, राज्यात सध्या शेतकरी आणि जनता अनेक अडचणींमध्ये आहे. मात्र सरकार अडचणीत असणाऱ्यांसाठी काही करू शकत नाही. उलट तेच अनेक विघ्न आणत आहेत. त्यामुळे गणरायानेच काहीतरी करावे अशी प्रार्थना केली.मनोज जरांगे यांचा मोर्चा आज मुंबईच्या दिशेने निघाला आहे. सरकार या मोर्चामध्ये अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु मराठा बांधव या अडथळ्याला जुमानणार नाहीत, असे अंबादास दानवे म्हणाले. भाजपला मराठा आंदोलनात अजिबात रस नाही. सतत खोटे बोलून जनतेची फसवणूक केली जात आहे, असा आरोपही त्यांनी केला.उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना हेच सत्ताधारी सरकारला अधिकार आहे असे म्हणत होते. सरकारने आरक्षण द्यावे अशी देखील त्यांची मागणी होती. आता त्यांचे महायुतीचे सरकार आले आहे. सरकार प्रचंड बहुमतात आहे. यामुळे मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी सरकारच्या मागे आम्ही उभे राहू. मात्र सरकारची मानसिकता आहे का? असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

## नझुल जमिनींच्या विशेष अभय योजनेला मुदतवाढ

# नागपूर-अमरावती विभागात १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२६ पर्यंत योजना सुरू राहणार

**नागपूर (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नागपूर आणि अमरावती विभागातील निवासी वापरासाठी दिलेल्या नझुल जमिनींच्या विशेष अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.विभागीय आयुक्त नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित समितीने नझुल जमिनींसंदर्भात सर्वंकष अभ्यास करून शासनाला अहवाल सादर केला होता. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार ही मुदतवाढ देण्यात आली आहे.या योजनेचा लाभ १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत घेता येईल. विविध कारणांमुळे आतापर्यंत या योजनेत सहभागी होऊ न शकलेल्या भाडेपट्टेदारांना यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.ही योजना फक्त त्या



नझुल जमिनींना लागू राहील ज्या लिलावाद्वारे-प्रिमियम किंवा अन्य प्रकारे भाडेतत्त्वावर निवासी वापरासाठी देण्यात आल्या आहेत. योजना संपल्यानंतर १ ऑगस्ट २०२६ पासून २३ डिसेंबर २०१५ आणि २ मार्च २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदी लागू होतील.

# प्रत्येक नागरिकाला आरोग्य सेवा अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण द्या-जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला शासकीय रुग्णालयांमधून आरोग्य सेवा अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण मिळाव्यात, यासाठी आरोग्य यंत्रणेने सक्षमपणे काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिवकुमार वलांडे, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकुमार नेहेरकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अविनाश आहेर, जिल्हा माता-बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद काकडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रवींद्र कानडे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी देवीदास कोकाटे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर समान ठेवण्यासाठी प्रत्येक



ग्रामपंचायत स्तरावर स्थापन केलेल्या ग्रामस्तरीय समितीच्या माध्यमातून मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी असलेल्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित करावे. समितीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून जनमानसांमध्ये व्यापक स्वरूपात जागृती करण्यात यावी. जिल्ह्यातील संशयित क्षयरुग्णांचे लवकर निदान व योग्य उपचार होणे हे क्षयरोग निर्मूलनासाठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी झोपडपट्ट्या, ऊसतोड कामगार वसाहती, औद्योगिक क्षेत्रे अशा ठिकाणी तपासणीची संख्या वाढवावी. सकारात्मक अहवाल आलेल्या रुग्णांवर तातडीने उपचार सुरू करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिले.डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया अशा आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्र व मोठ्या गावांमध्ये गृहभेटी सातत्याने करण्यात याव्यात. डास निर्मूलनासाठी कीटकनाशक फवारणी, साचलेले पाणी हटवणे व निर्जंतुकीकरण राखण्यावर भर द्यावा. जिल्ह्यातील जन्म व मृत्यूची नोंद वेळेत होावी, यासाठी खाजगी दवाखाने, प्रसुतीगृहांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नोंदी घेण्यात नियमित भेटी देऊन संकलन करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.बैठकीस सर्व आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी तालुका दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# जे काही देणे शक्य आहे ते नियमांत बसवून देणार कुणाचेही आरक्षण कमी करणार नाही-एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे अवघी मुंबई स्तब्ध झाली असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा समाजाला जे काही देणे शक्य आहे ते, कायद्याच्या व नियमांच्या चौकटीत बसवून विशेषतः कुणाचेही आरक्षण कमी न करता व कुणाचेही नुकसान न करता दिले जाईल, असे ते म्हणालेत.मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी मुंबईतील वातावरण तंग झाले असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. शिंदे म्हणाले, मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले होते. आजही ते आरक्षणाचा लाभ घेत आहेत. कुणबी नोंदी शोधण्यासाठी आपण शिंदे समिती स्थापन केली होती. त्यात हजारो नोंदी सापडल्या होत्या. ही समिती आजही काम करत आहे. सारथीच्या माध्यमातून आपण विविध कोर्सेस सुरू केले. त्याचाही मराठा समाजाला लाभ होत आहे.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातूनही हजारो तरुणांना रोजगारासाठी १५ लाखांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा लाभही त्यांना मिळत आहे. मराठा विद्यार्थ्यांना हॉस्टेलचीही सुविधा दिली जात आहे. विशेषतः ज्या ठिकाणी हॉस्टेल नाहीत त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना दरमहा भाडे दिले जात आहे. या विविध योजनांतून मराठा समाजाची मुले यूपीएससी, एमपीएससीच्या माध्यमातून पुढे जात आहेत. स्वतःच्या पायावर उभे टाकत आहेत. त्यामुळे शासन म्हणून आम्ही आमच्या अडीच वर्षांच्या काळात जे जे काही प्रयत्न केले, ते सर्व प्रयत्न मराठा समाजापुढे आहेत.पूर्वी



२०१६-१७ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते तेव्हाही मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. ते हायकोर्टातही टिकले होते. पण काही जणांनी त्याला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. त्यावेळच्या महाविकास आघाडीच्या सरकारने तिथे योग्य ती भूमिका घेतली नाही. त्यामुळे दुर्दैवाने सुप्रीम कोर्टात हे आरक्षण टिकले नाही. पण त्यानंतर मी मुख्यमंत्री झाल्यानंतर या समाजाला पुन्हा १० टक्के आरक्षण दिले. त्यामुळे माझी मराठा समाजाला नम्र विनंती आहे की, जे काही आम्हाला करता येईल ते आम्ही समाजासाठी केले आहे. यापुढेही ते करत राहू. पण समाजासमाजात तेढ निर्माण होणार नाही याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे.

एकनाथ शिंदे म्हणाले, ओबीसीचे आरक्षण कमी करून ते मराठा समाजाला मिळावे अशी मराठा समाजाचीही इच्छा नाही. ती नसावीही. तसे करताही येणार नाही. त्यामुळे जे योग्य आहे, कायद्याच्या व नियमांच्या चौकटीत बसणारे आहे, जे काही न्याय हक्क आहेत ते देण्याची भूमिका सरकारची आहे. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास मराठा समाजाला ओबीसींचे विविध लाभ मिळत आहेत. यासाठीच आमच्या सरकारने त्यांना १० टक्के आरक्षण दिले आहे. ते टिकले पाहिजे ही सरकारची भूमिका आहे. याउपर या प्रकरणी ज्या काही सूचना येतील त्या सूचनांचाही स्वीकार केला जाईल. पण जे काही योग्य आहे, कायदेशीर आहे, नियमात बसणारे आहे त्यावर सरकार आजही सकारात्मक आहे.आमची व मुख्यमंत्र्यांची या प्रकरणी चर्चा झाली. त्यानुसार मराठा समाजाला जे काही देणे शक्य आहे ते, पण कायद्याच्या व नियमांच्या चौकटीत बसून कुणाचेही आरक्षण कमी न करता, कुणाचेही नुकसान न करता ते दिले जाईल, असेही एकनाथ शिंदे यावेळी बोलताना म्हणाले.

## आमदार राजेश पाडवी यांचे बोरद येथे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा-तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी हे गेल्या काही दिवसांपूर्वी परदेशात होते मात्र नुकतेच मतदारसंघामध्ये त्यांचे आगमन झाले. या निमित्ताने त्यांनी बोरद येथील गणेश मंडळांना धावती भेट देण्याचा प्रयत्न केला. मात्र, वेळेअभावी त्यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी शहादा-तळोदा चौफुली येथे थांबून हितगुज केली. यावेळी ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

आमदार पाडवी बोरद येथे येत असल्याने काही स्थानिक गणेश मंडळ आणि भाजप कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्वागतासाठी एका भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. दुपारी ठीक दीड वाजता आमदार राजेश पाडवी बोरद येथील शहादा चौफुलीवर पोहोचले. कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत केले. या ठिकाणी गणेश मंडळांच्या वतीने आमदार पाडवी यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.



या सत्कार सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये पंचायत समितीचे माजी उपसभापती विजय राणा, बोरदच्या लोकनियुक्त सरपंच अनिता भिलाव, उपसरपंच संतोष ढोढरे, ग्रामपंचायत सदस्य साजन शेवाळे, माजी उपसरपंच निलीमा जाधव, तसेच मोड येथील भाजपचे ज्येष्ठ सदस्य प्रवीणसिंग राजपूत, गोपी पावरा, रवींद्र वरसाळे, महेश नवले, भगवान गिरासे, न्यूबनचे सरपंच अजय ठाकरे, सावरपाडा येथील सरपंच महेंद्र पवार, गोंडाळाचे उपसरपंच मंगला पवार, करडे येथील सरपंच मोहनसिंग निकवाडे, लाखापूर फॉरेस्टचे निलेश नाईक, अनिता नाईक, नितीन राणा, चंद्रकांत पाटील, बयसिंग पवार, रवींद्र भिलाव, दिपक जाधव, गौतम भिलाव, विनोद शेवाळे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून आमदार राजेश पाडवी यांच्याविषयी जनतेच्या मनात असलेले प्रेम आणि आदर दिसून आला.

## पावसाळी तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सर्वोदय विद्यामंदिर प्रकाशा संघाचा विजय

**शहादा । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच चावरा इंग्लिश मेडियम स्कूल शहादा यांच्या आयोजनातून दि. २१ व २३ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या पावसाळी तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा (सन २०२५-२६) उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींचा गट व १७ वर्षांखालील मुलींचा गट या दोन्ही गटांमध्ये सर्वोदय विद्यामंदिर प्रकाशा (ता. शहादा, जि. नंदुरबार) संघाने विजेतेपद मिळविले.

या विजयामुळे सर्वोदय विद्यामंदिर प्रकाशा संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन मा. तात्यासाहेब मोतीलालजी फकीराजी पाटील, व्हा. चेअरमन मा. हिरालालभाई पाटील, संचालक मा. दादासो अभिजीत पाटील, इंग्लिश मेडियम स्कूलच्या समन्वयिका आ. प्रीतीताई पाटील, सचिव



आ. ए.के. पाटील, तज्ञ संचालक आ. एस.पी. पाटील, सर्व संचालक मंडळ तसेच शाळेचे प्राचार्य श्री. एस.आर. पाटील, उपमुख्याध्यापक श्री. डी.टी. चौधरी, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. एम.आर. पाटील, पर्यवेक्षक श्री. बी.एस. चौधरी आणि सर्व शिक्षकवृंद यांनी खेळाडूंना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.या विजयी संघाला क्रीडा शिक्षक श्री. दिपक सुभाष निकुंभ सर यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शहादा तालुक्यात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

## नवी दिल्ली येथील भारती विद्यापीठात ह.भ.प समाधान महाराज शर्मा यांच्या प्रवचनाचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथील भारती विद्यापीठ कर्मचारी गणेशोत्सव मित्र मंडळ यांच्या वतीने २३ व्या स्थापना वर्षा निमित्त किर्तनकार, व्याख्याते,प्रवचनकार, वरीष्ठ मार्गदर्शक यांच्या प्रथम पर्वा निमित्त दि.१ सप्टेंबर २०२५ रोजी सोमवारी केज येथील ठाकूर श्री रामकृष्ण परमहंस परिवाराचे सुप्रसिद्ध विविध कथाकार भावरत्न गुरुदास ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

या प्रवचनात संत साहित्य,भागवत धर्म तसेच आधुनिक समाज जीवनातील अध्यात्माचे महत्त्व यावर समाधान महाराज आपले विचार मांडणार आहेत. भक्तीभाव,जीवनमूल्ये व सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीवर आधारीत त्यांचे कथन श्रोत्यांना आत्मिक उर्जा देणारे ठरणार आहे,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल ए-४ पश्चिम



विहार,न्यु रोहतक रोड, नवी दिल्ली ११००६३ (पश्चिम विहार ईस्ट मेट्रो स्टेशन जवळ) या परिसरात हे प्रवचन रात्रौ ७-३० वाजता आयोजित करण्यात आले असून विद्यार्थी, प्राध्यापक व भाविक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारती विद्यापीठ कर्मचारी गणेशोत्सव मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील,यांच्या इंदापूर येथील घरी गणपतीच्या आगमन

**इंदापूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या इंदापूर येथील भाग्यश्री बंगलो येथे श्री गणेशाची उत्साहात प्रतिष्ठापना भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीला बुधवारी (दि. २७) सकाळी करण्यात आली. यावेळी हर्षवर्धन पाटील व सौ. भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते धार्मिक वातावरणात विधिवत पूजा व आरती संपन्न झाली. आराध्य दैवत असलेल्या गणरायाच्या कृपेने चालु वर्षी सर्वत्र समाधानकारक पाऊस झाला आहे. त्यामुळे यंदा आपण गणरायाचे उत्साहात, जल्लोषामध्ये स्वागत करीत आहोत. आगामी काळातही श्री गणेश कृपेने परतीचा पाऊस



हा समाधानकारक येवो, त्यामुळे शेतातील पिके चांगली तरारतील व आगामी वर्षे शेतकरी व नागरिकांसाठी सुख-समृद्धीचे व आनंदाचे जावो, असे साकडे यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी श्री गणेश चरणी घातले. चालू वर्षी गणेशोत्सव ११ दिवसांचा आहे. श्री गणरायाचे आगमन म्हणजे आनंद आणि उत्साहाची आपणा सर्वांसाठी पर्वणीच असते. महाराष्ट्रामध्ये घराघरात गणरायांचे उस्फूर्तपणे स्वागत केले जात आहे, तसेच हा उत्सव देशभर आनंदाने साजरा केला जात आहे. श्री गणराया प्रत्येकाचे आयुष्य हे प्रगतीचे, भरभराटीचे व समाधान घेऊन येवो, या शब्दात जनतेला गणेशोत्सवानिमित्त हर्षवर्धन पाटील यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ । निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ।। कोणत्याही मंगल कार्याची सुरुवात सुखकर्ता व विघ्नहर्ता असलेल्या श्री गणेशाच्या पूजनाने केली जाते. भाग्यश्री निवासस्थानी श्री गणरायाच्या मूर्तीला आकर्षक अशी सजावट करण्यात आली आहे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, निरा भिमा कारखान्याच्या चेअरमन सौ. भाग्यश्री पाटील, युवा नेते राजवर्धन पाटील यांनी कुटुंबीयांसमवेत गणरायाचे यावेळी मंत्रोपचारामध्ये मनोभावे स्वागत केले.

## करचुंडी येथील गायरान प्रश्न १३ व्या दिवशी धरणे आंदोलन सुरूच

### जिल्हा कचेरी समोरील चार आंदोलकांची प्रकृती खालावली

**बीड । प्रतिनिधी**

करचुंडी येथील ग्रामस्थ गेल्या तीन पिढ्यापासून गायरान जमीन कसून आपली उपजीविका भागवत आहेत. काही लोकांचे नाव सातबारा ला लागले आहेत. तर काही लोकांचे नाव सातबारा मध्ये अद्याप लागले नाही. या मागणीसाठी १८ ऑगस्ट पासून हे बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. त्याची अद्याप दखल प्रशासनातील कुठल्याच अधिकाऱ्याने घेतलेला आहे. या धरणे आंदोलनकर्त्यांमध्ये चार लोक आजारी पडले आहेत. गावात पिण्याच्या पाण्याचे व्यवस्था नाही, धड काँक्रीटचे व्यवस्थित रस्ते नाही, दलितांसाठी स्मशानभूमी नाही, नळ योजना आल्या पण



फक्त कागदावरच खूप मोठा भ्रष्टाचार गावामध्ये झाला आहे. घरकुल योजना देखील काही ठराविक लोकांना दिली गेली त्यात मागासवर्गीय लोकांना डावला गेला आहे. राहिलेल्या लोकांच्या नावे सातबारावर नावे लावावी अशा मागणीसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. जोपर्यंत प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत मी आपल्याला बंद होणार नाही अशी भूमिका आंदोलनाचे नेतृत्व करणारे जयसिंग वीर यांनी घेतले आहे. त्यातच शासनाने शेतकऱ्यांची कसलीही संमती नसताना परस्पर जमीन वनविभागाच्या नावावर वर्ग केली आहे. या आंदोलनात दिवसेंदिवस सर्वच पक्ष संघटना व समाजसेवकांचा पाठिंबा मिळत आहे.

## आरोग्य सेवेत नवा टप्पा-डॉ.अमित डोके यांच्या 'संत वामनभाऊ क्लिनिक'चा युवा नेते सागर धस व सरपंच परिवंत गायकवाड यांच्या हस्ते शुभारंभ!

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील क-हेवडगाव येथे ग्रामस्थांच्या आरोग्य सेवेसाठी महत्त्वाचा ठरणारा उपक्रम सुरू झाला आहे.मातकुळी येथील डा.अमित डोके यांच्या 'संत वामनभाऊ क्लिनिक' तसेच विवेक सांगळे यांचे 'सिद्धिविनायक मेडिकल' यांचा शुभारंभ युवा नेते सागर धस व कडा कृ.उ.बा.समितीचे संचालक तथा क-हेवडगावचे सरपंच परिवंत गायकवाड यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

या प्रसंगी पैलवान राहुल जगदाळे, माजी सरपंच केशव बांगर,सरपंच बाळासाहेब सांगळे, नेते जालिंदर गायकवाड,सुभाष नागरगोजे, अजिनाथभाऊ सांगळे,कुमार गायकवाड,पत्रकार अक्षय विधाते, संतोष नागरगोजे,अत्तम मुकादम, महेश सांगळे,अण्णा खांडवे,श्रीधर खांडवे आदी मान्यवरांसह क-हेवडगाव,क-हेवाडी,पोखरी



येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या क्लिनिकच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार असून,हे पाऊल सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरेल,असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077